थाना सिडीआर एसडीआर।

IO प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** जिन्सी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0236 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/08/2025 21:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 22/08/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/08/2025
   **Time From (वेळेपासून):** 14:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/08/2025 **Time (वेळ):** 21:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 052
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/08/2025 21:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महानगर पालीका प्रभाग क्रमाक 9,येथील पहिल्या मजल्यावरिल कार्य,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

ा.क्र.
र्याल
ी व
फ

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): जुनेद खन पाशा खान पठाण

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोस्ट ऑफीस ,नुर कलनी जुना बाजार,छत्रपती संभाजीनगर ,जिन्सी,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोस्ट ऑफीस ,नुर कलनी जुना बाजार,छत्रपती संभाजीनगर ,जिन्सी,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9326237771

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती शोभा मिट्ठु आहेरकर | | | 1. महानगर पालीका झोन क्र 9,1 मनपा कर्टर रेल्वे स्टेशनजवळ, छत्रपती संभाजीनगर ,जिन्सी, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रीमती वर्षा वसंत महिरे | | | 1. शेजारी अदालत रोड, मनपा कर्टर, कोटला कलनी,छत्रपती संभाजीनगर ,जिन्सी,छत्रपती |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

दिनांक:-

22/08/2025

मी जुनेद खॉन पाशा खॉन पठाण वय 39 वर्ष व्यवसाय व्यापार पत्ता नुर कॉलनी जुना बाजार पोस्ट ऑफीस छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9326237771

मी दिनांक 22/08/2025 रोजी पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात समक्ष भेटुन त्यांना लोकसेवक पैशाची मागणी करत असलेबाबत सांगितल्याने त्यांनी पोलीस निरीक्षक श्री. धर्मराज बांगर यांना त्यांचे कक्षामध्ये बोलावुन माझ्या तक्रारीप्रमाणे कारवाई करणे बाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री. धर्मराज बांगर यांच्या सोबत त्यांचे कक्षात आलो असता मी त्यांना माझे कडे काम करुन देण्यासाठी शासकीय कर्मचारी पैशाची मागणी करत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी पोअ/हिवाळे यांना पंच आनने कामी आदेशीत केले. थोड्यावेळाणे पोअ/हिवाळे हे दोन पंच घेवुन कार्यालयात हजर झाले. त्यानंतर कार्यालयात हजर झाले पंचाना पोलीस निरीक्षक श्री. बांगर यांनी त्यांची व माझी ओळख करुन देवुन मला तक्रार द्यावयाची असल्याचे पंचाना सांगितले. त्यानंतर मी पंचासमक्ष तक्रार दिली की, " मी वरिल प्रमाणे अर्जदार जुनेद खॉन पाशा खॉन पठाण मी दु चाकी चार चाकी अक्सेसरीज चा व्यापार करतो त्यावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालततो. माझा मुलगा ईन्जमाम जुनेद खॉन पठाण व मुलगी नुरुलऐन जुनेद खॉन पठाण याचे जन्म दाखल्या मध्ये दुरुस्ती करण्या करिता म.न.पा. कार्यालय वार्ड D-9 छत्रपती संभाजीनगर येथे अर्ज केला असता त्या ठिकाणी कामकाज करणारे वर्षा मॅडम व अहेरकर मॅडम हे जन्म दाखला करुन देण्या करिता 3000(तिन हजार) रुपयेची मागणी करित आहे.

आज दिनांक 22/08/2025 रोजी मला अहेरकर मॅडम यांनी फोन वरती ऑफिसला भेटण्या करिता बोलाविले आहे त्या ठिकाणी ते काम करुन देण्याकरिता पैशाची मागणी करतील तरी मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. माझ्यात व आहेरकर मॅडम व वर्षा मॅडम यांच्यात कोणत्याही आर्थिक देवान घेवान व्यवहार नाहीत किंवा कोनतीही वैर व दुश्मनी नाही तरी संबधीत लोकसेवक यांना भेटण्यास जाणार असुन त्यांनी काम करुन देण्याकरिता पैशाची मागणी केल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती. " वगैरे मजकुराची तक्रार दिली.

माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 22/08/2025 रोजी पोनि/बांगर, पोनि/कोरे, पंच व सापळा पथकासह खाजगी वाहणाने मोंढा नाका मार्गे जालना रोड येथे सुरक्षित ठिकाणी पोहचलो. त्यानंतर आहेरकर मॅडम व वर्षा मॅडम हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत मला व पंच क्रमांक 1 यांना महानगर पालीका प्रभाग क्रमाक 9, छत्रपती संभाजीनगर येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/बांगर यांनी मला व

पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 यांना अहेरकर मॅडम यांनी त्यांचे ऑफिसला भेटण्याकरिता बोलाविल्या प्रमाणे महानगर पालीका प्रभाग क्रमाक 9, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविले. मी व पंच क्रमांक -1 असे महानगर पालीका प्रभाग क्रमाक 9, छत्रपती संभाजीनगर येथील पहिल्या मजल्यावरिल कार्यालयात गेलो. त्याठिकाणी माझी व आहेरकर मॅडम यांची भेट झाली भेटी दरम्यान माझे कामासंदर्भाने चर्चा झाली. आहेरकर मॅडम हे मला म्हणाले की, साधारण जो है वो बना के देने के लिए 500 रुपये लगते त्यावेळी मी त्यांना अर्जट मे देने को असे म्हटंल्यावर आहेरकर मॅडम यांनी मला तिन हजार रुपये लागतील असे म्हणुन त्यांनी त्यांचे समोरील टेबलवर बसलेल्या वर्षा मॅडम यांना हाताची दोन बोटे दाखवुन (दोन हजार रुपये ) ईशारा केला त्यावेळी वर्षा मॅडम यांनी त्यास त्यांची मान हालवुन होकार दिला. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे आल्यानंतर पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/बांगर, मी, पंच व सापळा पथकतील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, आहेरकर मॅडम यांनी 2000/-रुपये लाचेची मागणी करुन त्यास वर्षा मॅडम यांनी सहमती दिली आहे.

त्यानुसार पोनि/बांगर यांनी मला व दोन्ही पंचांना आहेरकर मॅडम व वर्षा मॅडम यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/बांगर यांनी वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/बांगर यांनी सापळा कारवाईसाठी ॲथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/बांगर यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 2000/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 4 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास ॲथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पठाणी शर्टचे उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/बांगर यांनी मला आहेरकर मॅडम व वर्षा मॅडम यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 2000/-रु. काढुन त्यांना द्याव्यात व त्यानंतर माझ्या कडे असलेला चष्मा डोळ्यावर लावुन कार्यालयाच्या बाहेर येण्याचा सांकेतीक नियोजीत असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 2000/-रु. लाच रक्कम आहेरकर मॅडम व वर्षा मॅडम यांना देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/बांगर, पोनि/कोरे,पोह/जोशी पोअं. हिवाळे,मपोअ/दराडे, मपोअ/कुंटे, चालक पोअ/बागुल पंच क्र. 2 असे सापळा पथकासह शासकीय व खाजगी वाहणाने येत होते. मी व पंच क्रमांक 1 असे महानगर पालीका प्रभाग क्रमाक 9, छत्रपती संभाजीनगर येथील पहिल्या मजल्यावरिल कार्यालयात गेलो. त्याठिकाणी आहेरकर मॅडम यांचे भेट घेतली असता त्यांनी मला त्यांच्या समोरील वर्षा मॅडम यांच्याकडे कादगपत्र देवुन पाठविले. वर्षा मॅडम यांना मी माझ्या आडनावाच्या पुढे पठाण लावण्याची विनंती केली. त्यावेळी वर्षा मॅडम यांनी सब तरफ है क्या ऐसी ही, ये सब तरफ लगाणा है क्या. असे म्हणुन मला कागदपत्र पुन्हा आहेरकर मॅडम यांचे कडे देण्यास सांगितले. त्यानंतर मी आहेरकर मॅडम यांना कागदपत्र देवुन त्यांचे मागणी प्रमाणे दोन हजार रुपये देवुन पाच - पाच सौ की चार है गिन लो असे सांगुन त्यांनी माझ्या मुलांच्या जन्मप्रमाणपत्रावर खॉन अडनावाच्या पुढे पठाण लावण्याचे कबुल केले. त्यानंतर मी कार्यालयाच्या बाहेर डोळ्याला काळा चष्मा लावुन येताच सापळा पथकाला लाचस्विकृतीचा नियोजीत ईशारा समजला.

सदरचा नियोजीत इशारा प्राप्त होताच पोनि/बांगर, पोनि/कोरे, पोह/जोशी, पोअं. हिवाळे, ,मपोअ/दराडे, मपोअ/कुंटे, पंच क्र. 2 असे सापळा पथकातील सदस्य हे तात्काळ महानगर पालीका प्रभाग क्रमाक 9, छत्रपती संभाजीनगर येथील पहिल्या मजल्यावरिल कार्यालयात हजर झाले. पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोनि/कोरे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/बांगर यांनी आहेरकर मॅडम व वर्षा मॅडम यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/बांगर यांनी पंच क्रमांक-1 यांना पंच क्रमांक 2 यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्रमांक -1 यांनी सांगितले की, " श्रीमती आहेकर मॅडम यांनी लाचेची मागणी करुन लाच रक्कम वर्षा मॅडम यांच्या संमतीने सांगितलेप्रमाणे 2,000/- रूपये लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन स्वत:चे टेबलचे उजव्या बाजुकडील ड्रावर मध्ये ठेवले आहे." असा खुलासा पंच क्रमांक 1 यांनी केला.

पोनि/बांगर यांनी श्रीमती आहेरकर व श्रीमती वर्षा यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव अनुक्रमे 1)

श्रीमती शोभा मिठ्ठु आहेरकर, वय 56 वर्ष व्यवसाय नोकरी पद- शिपाई ने. महानगर पालीका झोन क्र. 9 छत्रपती संभाजीनगर रा. हाऊस नंबर 1 मनपा कॉर्टर रेल्वे स्टेशनजवळ राहुलनगर, छत्रपती संभाजीनगर (वर्ग-4), 2) श्रीमती वर्षा वसंत महिरे, वय 36 वर्ष, नोकरी पद- शिपाई ने. महानगर पालीका झोन क्र. 9 छत्रपती संभाजीनगर रा. मनपा कॉर्टर, कोटला कॉलनी शेजारी अदालत रोड छत्रपती संभाजीनगर (वर्ग-4) असे सांगीतले. पोनि/बांगर यांनी श्रीमती शोभा आहेरकर यांना 2000/-रु. लाच रकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे टेबलचे उजवे बाजुचे ड्रावर मध्ये ठेवली आहे असे सांगितले. पोनि/बांगर यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले असता, पंच क्रमांक 2 यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/बांगर यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/बांगर यांनी श्रीमती शोभा आहेरकर यांना माझे कामासंदर्भातील कागदपत्राबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे टेबल वरिल कागपत्रे काढून दिलेने सदरची कागदपत्रे पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर पोनि/बांगर यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/बांगर, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे आलोत. त्याबाबत दिनांक 22/08/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे.
त्यानंतर पोनि/बांगर यांनी मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगुन त्याप्रमाणे फिर्याद द्यावी असे सांगीतल्याने मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत पोनि/बांगर यांचे समक्ष माझी फिर्याद कथन केली त्याप्रमाणे टंकलिखीत करण्यात आलेली आहे.
तरी दिनांक 22/08/2025 रोजी 14.31 वा. ते 15.48 वा. दरम्यान महानगर पालीका प्रभाग क्रमाक 9, छत्रपती संभाजीनगर येथील पहिल्या मजल्यावरिल कार्यालयात, माझ्या मुलांच्या जन्म प्रमाणपत्रातील नावांची दुरुस्ती करण्याकरिता श्रीमती शोभा आहेरकर यांनी माझ्या कडे 2000/-रुपयाची मागणी करुन त्या लाचमागणीस श्रीमती वर्षा महिरे प्रोत्साहण देवुन, श्रीमती शोभा आहेरकर यांनी माझ्या कडुन 2000/-रुपयेची लाचेची रक्कम स्विकारली आहे. सबब त्यांचे विरोधात माझी कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहीली ती बरोबर व खरी आहे.
समक्ष दाखल करणारः- पोह/1646 डकले तपासिक अधिकारी ः- पोलीस निरिक्षक धर्मराज बांगर ने. ला.प्र. वि.छक्षपती संभाजीनगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद** केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
GANESH SUBHASH MANE
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** PSI
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Shivaji Murlidhar Bu
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH72782

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे जिन्सी
छत्रपती संभाजीनगर